# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी : २५६०१२६०
तारेचा पत्ता : 'युनिपुना'
फॅक्स : ०२०–२५६९१२३२

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

संदर्भ : शै.प्रवेश/१३९७

दिनांक : २०.०९.२०११

प्रति,
**मा. विभागप्रमुख/मा. प्राचार्य/मा. संचालक,**
पुणे विद्यापीठ आवारातील सर्व शैक्षणिक विभाग/
पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये/
मान्यताप्राप्त संशोधन संस्था व संशोधन केंद्र.

**विषय** : विद्यापती (एम.फिल) व विद्यावाचस्पती (पीएच.डी.) अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शुल्कासंबंधी.

महोदय/महोदया,

या पत्राद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येत आहे की, पुणे विद्यापीठातील शैक्षणिक विभागांमध्ये तसेच पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली महाविद्यालये/संस्था/संशोधन केंद्र यामध्ये विद्यापती (एम.फिल) व विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून ज्या शुल्कांचा परतावा समाज कल्याण विभागाकडून केला जातो, ते शुल्क संबंधित विद्यार्थ्यांकडून घेऊ नये.

शासनाच्या शुल्कासंबंधी असलेल्या सवलतींचा ज्या विद्यार्थ्यांना लाभ घ्यावयाचा आहे. त्या विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्तीसाठी असलेला विहित नमून्यातील अर्ज योग्य त्या कागदपत्रांसह भरुन घ्यावेत. शासनाची शिष्यवृत्ती अथवा विद्यापीठाची अधिछात्रवृत्ती यापैकी एकच लाभ विद्यार्थ्यांना घेता येईल याची नोंद घ्यावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

29/9/11

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग